(राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का.७ दि.०१/१०/२०२५ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट - १०

## पालघर जिल्हा पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ०८ पंचायत समित्या

## सूचना

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा अधिनियम ५) चे तरतुदी अन्वये पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ०८ पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी त्या जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभागाची व पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणातील एकूण सदस्य संख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच स्त्रियांकरिता (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, सर्वसाधारण स्त्रियांसह) राखून ठेवण्यात आलेले निवडणूक विभाग व निर्वाचक गणाबाबत जिल्हाधिकारी पालघर यांच्या **क्रमांक सामान्य प्रशासन/पालघर जिल्हा परिषद निव.विभाग प्रारुप आरक्षण/कावि-१०/२०२५, दिनांक १४/१०/२०२५** च्या प्रारुप अधिसूचनेची प्रत खाली दर्शविलेल्या ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहे व अशी सूचना देण्यात येत आहे की, उक्त मसुदा जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून त्या आदेशात नमुद केल्यानुसार **दिनांक १४/१०/२०२५** नंतर विचारात घेण्यात येईल.

१) जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील फलकावर
२) जिल्हा परिषद कार्यालयातील फलकावर
३) तहसीलदार तलासरी/ डहाणू/ विक्रमगड/ जव्हार/ मोखाडा/ वाडा/ पालघर/ वसई कार्यालयातील फलकावर
४) पंचायत समिती डहाणू/ विक्रमगड/ जव्हार/ मोखाडा/ वाडा/ पालघर/ वसई कार्यालयातील फलकावर

२. आदेशाच्या मसुद्यास कुणाची हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची जी सकारण लेखी निवदने/ हरकती/ सूचना जिल्हाधिकारी/ संबंधित तालुक्याचे तहसीलदार यांचेकडे **दिनांक १७/१०/२०२५** पर्यंत सादर करावेत. उपरोक्त तारखेनंतर जिल्हाधिकारी यांच्याकडे आलेली निवेदने/ हरकती/ सूचना इत्यादी विचारात घेतले जाणार नाहीत.

**जिल्हा : पालघर**
**दिनांक : १४/१०/२०२५**

**(डॉ. इंदु राणी जाखड)**
**जिल्हाधिकारी पालघर**